हिंदु संघटन आणि हिंदु राष्ट्राच्या स्थापनेसाठी कार्यरत

# हिंदु जनजागृति समिति

नोंदणी क्र. : 1540/I-634, १२.११.२००२, फोंडा, गोवा.

भ्रमणध्वनी
९३२६१०३२७८
ई-मेल
contact@HinduJagruti.org
संकेतस्थळ
www.HinduJagruti.org

नोंदणीकृत कार्यालय : 'मधु स्मृति', घर क्र. ४५७, पहिला मजला, बैठक सभागृह, सत्यनारायण मंदिराजवळ, ढवळी, फोंडा, गोवा ४०३ ४०१.

।। जयतु जयतु हिन्दुराष्ट्रम् ।।

प्रती, दिनांक : २३.१२.२०१४

माननीय संपादक / मुख्य वार्ताहर यांस,

कृपया प्रसिद्धीसाठी !

## हिंदूंच्या श्रद्धास्थानांची बदनामी करणाऱ्या 'पीके' या हिंदी चित्रपटाच्या विरोधात हिंदूंमध्ये संतापाची लाट : मुंबई-नागपूरात तक्रारी दाखल !

आधीच नग्नतेमुळे वादाच्या भोवऱ्यात अडकलेला 'पीके' हा हिंदी चित्रपट १९ डिसेंबर रोजी प्रदर्शित झाला; मात्र राजकुमार हिरानी दिग्दर्शित आणि आमीर खान यांची मुख्य अभिनयाची भूमिका असलेल्या या चित्रपटात हिंदूंच्या देवता, साधू-संत, मंदिरे, पूजाविधी यांची अत्यंत खालच्या स्तरावर जाऊन बदनामी करण्यात आली आहे. त्यामुळे देशभरातील कोट्यवधी हिंदूंमध्ये प्रचंड संतापाची लाट उसळली आहे. त्यामुळे चित्रपटाच्या विरोधात हिंदु जनजागृती समितीचे नवी मुंबईतील पदाधिकारी डॉ. उदय धुरी यांनी नवी मुंबई पोलीस उपायुक्त यांच्याकडे, तर नागपूर येथील हिंदु धर्माभिमानी श्री. जयंत दळवी यांनी नागपूर पोलीस आयुक्त, महाराष्ट्र पोलीस महासंचालक व मुख्यमंत्री यांच्याकडे लिखित स्वरूपात तक्रार दाखल केली आहे.

या तक्रारीमध्ये 'पीके' चित्रपटातील अनेक संवादामुळे धार्मिक भावना दुखावल्याचे म्हटले आहे. उदा. ''जो डरते, वोही मंदिर जाते है'', ''शिव को दुध चढाना अंधश्रद्धा है'', ''मंदिर बांधना, तीर्थयात्रा जाना ये धर्म नही है'', अशी अनेक आक्षेपार्ह आणि हिंदूंची धार्मिक भावना दुखावणारी अन् भडकवणारी वाक्ये अभिनेत्याच्या तोंडी घालण्यात आलेली आहेत. तसेच 'मिसींग परसन' (missing persons) म्हणून हिंदूंच्या देवता उदा. मारुती, श्रीराम, श्रीकृष्ण यांचे पोस्टर्स लावल्याचे दृष्य दाखवण्यात आले आहे. हिंदूंच्या देवता, साधू व संतांविषयी अनेक आक्षेपार्ह दृष्ये या चित्रपटात प्रदर्शित करण्यात आली आहेत.

त्यामुळे या चित्रपटाचा निर्माता, दिग्दर्शक, अभिनेता, अभिनेत्री, अन्य कलाकार, कथा लेखक, वितरक आणि अन्य सर्व संबंधितांच्या विरोधात हिंदूंच्या धार्मिक भावना दुखावणे, हिंदूंच्या धार्मिक भावना भडकतील असे संवाद-दृष्ये प्रदर्शित करणे, समाजात धार्मिक तेढ निर्माण करून सामाजिक सलोखा व एकसंघता बिघडवून समाजातील शांतता धोक्यात आणणे आदींबाबत भारतीय दंडसंहितेच्या कलम १५३ (अ), २९५ (अ) आणि अन्य कलमांखाली फौजदारी स्वरुपाचे गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे.

तसेच या समाजात शांतता टीकावी म्हणून चित्रपटातील धार्मिक तेढ निर्माण करणारी संवाद, दृष्ये आदी वगळण्यात येईपर्यंत चित्रपटाच्या प्रदर्शनावर राज्यात तात्काळ स्थगिती आणण्यात यावी, अशी विनंतीही मुख्यमंत्री आणि पोलीस महासंचालक यांच्याकडे करण्यात आली आहे. या विषयी हिंदु जनजागृती समितीच्या वतीने नागपूर येथे शिवसेना आणि भाजप पक्षाच्या काही आमदारांना भेटून हा हिंदूंवरील अन्याय दूर करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच या विषयी चालू असलेल्या महाराष्ट्र विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात आवाज उठवण्याची मागणी करण्यात आली आहे.

आपला नम्र,

सुनील घनवट

श्री. सुनील घनवट, महाराष्ट्र संघटक,
हिंदु जनजागृती समिती, (संपर्क : ८४५१००६०५२)